**ONE DAY WORKSHOP ON MODI SCRIPT, Monday, 19 January, 2026**

पुण्य नगरी
सांगली । शुक्रवार, २३ जानेवारी २०२६

# आदर्शमध्ये मोडी लिपीवर कार्यशाळा

**तासगाव / प्रतिनिधी**

येथील आदर्श कॉलेजमध्ये अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व इतिहास विभागाच्या विद्यमाने मोडी लिपीवर कार्यशाळा झाली. प्राचार्य डॉ. यु. के. मोहिते अध्यक्ष होते. मोडी लिपी अभ्यासक पांडुरंग सुतार प्रमुख मार्गदर्शक होते. यावेळी शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य प्रा. डॉ. निवासराव वरेकर, मोडी लिपी वर्गाचे समन्वयक प्रा. डॉ. बाळासो कर्पे, समन्वयक प्रा. डॉ. विहार निसर्गंध उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. यु. के. मोहिते म्हणाले, आपल्या इतिहासातील वैभवशाली घटनांचा अभ्यास करावयाचा असल्यास मोडी लिपी अभ्यासणे आवश्यक आहे. गतकाळातील बरीच इतिहासाची साधने मोडी लिपीत आहेत. या कार्यशाळेच्या माध्यमातून इतिहासाच्या अभ्यासकांना मराठा काळातील संशोधन करताना येणाऱ्या अडचणी कमी होणार आहेत. हे लक्षात घेऊन संस्थापक अध्यक्ष ॲड सदाशिवराव पाटील, विद्यमान अध्यक्ष शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य ॲड. वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन केले. प्रा. डॉ. निवासराव वरेकर म्हणाले, मराठा व पेशवे काळातील अनेक कागदपत्रे अभ्यासाशिवाय आहेत. आजच्या इतिहास अभ्यासकांनी मोडी लिपी शिकून घ्यावी. पांडुरंग सुतार यांनी दोन सत्रात मोडीवर मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. विहार निसर्गंध यांनी आभार मानले. प्रा. डॉ. बाळासो कर्पे यांनी सूत्रसंचालन केले. इतिहास विभागातील सर्व विद्यार्थी तसेच मोडी लिपी वर्गात प्रवेशित सर्व विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

आदर्श कॉलेज, विटा
स्थापना १९९१
ता. खानापूर, जि. सांगली

प्राचार्य.
आदर्श कॉलेज, विटा
ता. खानापूर, जि. सांगली